# एका शास्त्रीय पुस्तकाचा खेळखंडोबा

## बहुतांची अंतरे

वाढत्या महागाईमुळे 'घर पहावे बांधून' ही म्हण मध्यमवर्गीयांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. त्यांत 'पुस्तक पहावे छापून' असा थोडा बदल करून माझा स्वत:चा अलिकडला एक अनुभव नमूद करीत आहे.

१९७८ साली महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून मला एक पत्र आले. त्यांत मी खगोलशास्त्रावर मराठीतून पुस्तक लिहावे अशी विनंती होती. मंडळाला पुस्तक लवकर लिहून हवे होते. त्यावेळी मी इंग्रजीत एक पुस्तक लिहिण्यात गुन्तलो असल्याने अपेक्षित असलेल्या वेळेपर्यन्त माझ्या हातून मराठी पुस्तक लिहून पुरे होणार नाही असे मी मंडळाला कळवले व माझ्याऐवजी दुसऱ्या तज्ञांची नावे लेखक म्हणून सुचवण्याची तयारी दर्शविली. पुष्कळ दिवसांनी मंडळाकडून उत्तर आले व त्यांस पुस्तक मीच लिहावे अशी इच्छा व्यक्त करण्यात आली. त्या इच्छेला मान देऊन मी 'खगोलशास्त्राचे विश्व' हे पुस्तक लिहिले आणि मे, १९७९ मध्ये त्याचे हस्तलिखित रेखाचित्रे व छायाचित्रांसह मंडळाला सुपूर्द केले. राज्यभाषा वर्षात मराठीची सेवा आपल्या हातून झाली याचे मला समाधान वाटले.

त्याअर्थी मंडळाला पुस्तक लवकर लिहून पाहिजे होते त्याअर्थी मंडळ ते पुस्तक लवकरच प्रसिध्द करेल अशी गोड गैरसमजूत मी करून घेतली. भारतात आणि परदेशात माझी अनेक पुस्तके प्रसिध्द झाली पण ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाबद्दल मला जे काही अनुभव आले ते औरच होते. ही (अद्याप न संपलेली) गोष्ट थोडक्यात अशी :

साहित्य संस्कृती मंडळासारख्या प्रतिष्ठित संस्थेकडून आपले पुस्तक लवकरच प्रसिध्द होणार ह्या सुखस्वप्नातून मला प्रथम जागे केले पुण्याच्या एका संस्कृत विद्वानांनी. 'कशाला तुम्ही साहित्य संस्कृति मंडळाच्या फंदात पडलात ? कदाचित् तुम्हाला माझ्यासारखा अनुभव येणार नाही अशी आशा करतो' त्या प्राध्यापकांनी मला सुनावले. आज त्यांचे बोल पटतात.

हस्तलिखित मंडळाकडे पोचवल्यावर कळले 'कागद उपलब्ध नसल्याने छपाई लांबणीवर पडणार.' कागदाची सोय नसताना लेखकाकडून ठराविक वेळेपर्यन्त लेखनाची आवश्यकता का असावी ? हा विचार मनात आला— पण टंचाईच्या काळात सर्व काही चालवून घ्यावे लागते. मात्र मी एप्रिल १९८० अखेर वर्षासाठी परदेशी जाणार असल्याने त्यापूर्वी गॅलीप्रूफचे काम उरकावे अशी विनंती मी मंडळाला केली.

एप्रिल १९८० च्या प्रारंभी मला मंडळाकडून अचानक फोन आला "कागद आला. आता तुमचे पुस्तक छपाईच्या मार्गावर जाणार."

"पण मी आता लवकरच परदेशी जाणार" मी बोलून गेलो.

"किती तारखेला जाणार ?"

"२५ एप्रिलला पहाटे."

"मग त्यापूर्वी तुमचे पुस्तक छापून देऊ."

मी सर्दच झालो. तीन आठवड्यांत २०० पानी सचित्र वैज्ञानिक पुस्तक छापणार ? मोठ्या परदेशी मुद्रकांना जे जमणार नाही ती किमया करून दाखवायला मुद्रकाजवळ जादूचा दिवा तर नसेल ? आणि गंमत म्हणजे खुद्द मुद्रकानेही तितक्याच आत्मविश्वासाने तसे करायची तयारी दर्शविली. अशा घाईत छापलेल्या पुस्तकात मुद्राराक्षस किती थैमान घालेल याची मलाच भीती वाटत असल्याने दोनदा प्रूफे तपासल्याशिवाय मला समाधान वाटणार नाही असे मी मुद्रकाला पटवून दिले. अखेर, मी परदेशी असताना प्रूफाची ने-आण हवाई डाकने करायची व्यवस्था केली. माझ्याकडे आलेली प्रूफे तपासून लगेच पाठवली. तरी देखील तीन आठवड्यात छपाई करू पाहणाऱ्या मुद्रकांनी ह्या कामाला सव्वा वर्ष घेतले.

जुलै १९८१ उजाडला आणि शेवटची प्रूफे हातावेगळी झाल्यावर मला हायसे वाटले. दिवाळीपर्यन्त पुस्तक हाती येईल अशी आशा वाटू लागली. पण पुस्तकाचे गाडे पुढे जाईना ! कारण ? मंडळाच्या अध्यक्षांची दोन पानी प्रस्तावना यायची होती. ती प्रस्तावना मे १९७९ पासून दहा महिने माझे हस्तलिखित मंडळाकडे असताना का लिहिली गेली नाही हे मला न उलगडलेले कोडे आहे. प्रस्तावना लिहिणारे सुट्टीवर, त्यांनी लिहून ती अध्यक्षांकडे पाठवायची ती फाइल अजून इकडच्या टेबलावरून तिकडे सरकली नाही, मी मुम्बई. टेलिफोनच्या असहकाराला न जुमानता सारखे फोन लावतोय. 'प्रस्तावना माझ्यापुढे आली की मी लगेच पास करतो' हे अध्यक्षांचे आश्वासन ... अखेर ऑक्टोबर अखेरपर्यन्त गंगेत घोडे न्हाले. सुदैवाने प्रस्तावनेचे प्रूफ माझ्याकडे तपासण्यासाठी आले— कारण मूळ प्रस्तावनेत पुस्तकाचे नावच चुकीचे होते !

दिवाळी नाहीतर १९८१ अखेरपर्यन्त तरी हे पुस्तक प्रसिध्द होईल का, असे मी पत्र लिहून अध्यक्षांना विचारले. पत्राचे उत्तर आले नाही पण छपाईची गाडी पुन्हा थांबली. मुखपृष्ठावर मंडळाचे मुद्राचिन्ह छापायचे होते.... अखेर ते मंडळाकडून मुद्रकाला मिळाले. अजूनही गाडी स्टेशनातच. कारण मंडळाने पुस्तकाची किंमत ठरवली नव्हती आणि ती पुस्तकावर छापणे आवश्यक होते. पण आता मंडळाच्या दिरंगाईला मुद्रकही कंटाळला असावा. त्याने मला तोडगा सुचवला 'बाकीचे पुस्तक छापतो. पुस्तकाचे कव्हर तयार होत आहे. ते तयार होईपर्यन्त किंमत ठरेल व ती कव्हरवरच छापू.' पण मंडळ थंडच. कव्हर तयार झाले, पण किंमत ठरली नव्हती. मी फोनवर लकडा लावत होतो. अखेर ती ठरली आणि मी फोनवरून मुद्रकाला कळवली. कारण मंडळाच्या लाल फीतीतून ती किंमत मुद्रकापर्यन्त पोचायला किती वेळ लागेल याची खात्री नव्हती.... अखेर १९८२ च्या फेब्रुवारीत पुस्तकाच्या पाच प्रती मुद्रकाने पोचवल्या.

एप्रिल १९८२ मध्ये मंडळाने माझे लेखकाचे मानधन दिले त्या अर्थी पुस्तक छापून पुरे झाले असे मंडळाला कळले असावे आणि मी पुस्तक प्रसिध्द झाले असे माझ्या मित्रांना, सहकाऱ्यांना सांगून टाकले.

पण आधी सांगितल्याप्रमाणे ही गोष्ट अजून संपली नाही. पुस्तकाच्या प्रती मुद्रकाकडेच पडून आहेत आणि मंडळाकडून काही सूचना येईपर्यन्त त्या तशाच पडून राहणार. पुस्तक रीतसर केव्हा बाहेर येणार आणि कुठे विकत मिळणार, असे मी मंडळाला पत्र लिहून विचारले, पण अद्याप उत्तर नाही. आता माझी सहनशक्ती संपली आहे.

कदाचित् वरील अनुभवावरून मंडळाने मला इतर लेखकांपेक्षा चांगली वागणूक दिली असे तुम्ही म्हणाल. मला मात्र काही प्रश्न पडतात. पुस्तक छापण्यात व ते प्रसिध्द करण्यात अशी दिरंगाई दाखवणे खाजगी क्षेत्रातल्या प्रकाशकाला परवडले असते का ? ज्या उद्देशाने अशा शासकीय प्रकाशन संस्था स्थापन केल्या जातात ते उद्देश अशा प्रकारच्या लाल फीतीने पूर्ण होतात का ? पुस्तक लिहून घेतले आणि लेखकाला मानधन दिले की काम संपले अशी मनोवृत्ती जर प्रकाशकाची असेल तर त्या पुस्तकाचा फायदा कोणाला आणि कसा होणार ?

माझे पुस्तक केव्हा प्रसिध्द होईल ते होवो, मी मात्र अशा संस्थांपासून दोन हात लांबच राहण्याचा निश्चय केला आहे.

**जयंत नारळीकर, मुंबई**